आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -  संध्याकाळी ७.०० वाजता

१३ मे २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात राज्यातल्या ११ मतदारसंघांमध्ये प्राथमिक आकडेवारीनुसार साडे ५२ टक्के मतदान

- कापूस उत्पादक शेतकऱ्यांना निवडणुकीनंतर ४ हजार कोटी रुपये देण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं आश्वासन

- सत्तेत आल्यावर मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचं काँग्रेसचं आश्वासन

- मुंबईसह आसपासच्या परिसरात पावसाची हजेरी, वाहतूक व्यवस्थेवर परिणाम, होर्डिंग पडल्यानं ७ जण जखमी

**आणि**

- येत्या रविवारपर्यंत नैऋत्य मौसमी पाऊस अंदमानमध्ये दाखल होण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

राज्यातल्या पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड या ११ मतदारसंघात साडे ५२ टक्के मतदारांनी आज मतदानाचा हक्क बजावला.

सर्वाधिक सुमारे ६० टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद नंदूरबारमध्ये झाली. सर्वात कमी सुमारे ४४ टक्के मतदान शिरुरमध्ये झालं. पुण्यात सुमारे ४५ टक्के तर मावळमध्ये ४६ टक्के मतदानाची नोंद झाली.

**मतदारसंघ निहाय मतदानाची टक्केवारी याप्रमाणे आहे. -**

जळगाव-  सुमारे ५२ टक्के

रावेर - ५५ पूर्णांक ३६ दशांश टक्के

जालना - सुमारे ५९ टक्के

औरंगाबाद - ५४ टक्क्यांहून अधिक

अहमदनगर - ५३ पूर्णांक २७ शतांश टक्के

शिर्डी -५५ पूर्णांक २७ शतांश टक्के

बीड - ५८ पूर्णांक २१ शतांश टक्के

**<><><><><>**

चौथ्या टप्प्यात आज राज्यातल्या एकूण २९८ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद झालं. या टप्प्यात रिंगणात असलेल्या महत्त्वाच्या उमेदवारांमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राज्य सरकारमधले मंत्री संदीपान भुमरे, पंकजा मुंडे, चंद्रकांत खैरे, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, वसंत मोरे यांच्यासह विद्यमान खासदार हीना गावित, रक्षा खडसे, इम्तियाज जलील, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, सुजय विखे-पाटील, सदाशिव लोखंडे यांच्यासारखे अनेक उमेदवार रिंगणात होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात आज पुणे, शिरूर आणि मावळ मतदारसंघात मतदान पार पडलं. तिन्ही मतदारसंघांत मतदान केंद्रांवर विविध उपक्रम राबवण्यात आले होते.

पुण्यातल्या गृहनिर्माण संकुलांमध्ये यंदा प्रथमच ३५ मतदान केंद्र उभारली होती. या केंद्रांना मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला. पुणे मतदारसंघातल्या पाच मतदान केंद्र संचलित करण्याची जबाबदारी महिला, युवक आणि दिव्यांग कर्मचारी अधिकाऱ्यांना दिली गेली होती. तर काही मतदान केंद्रांवर पुण्यातल्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची माहिती सादर केली गेली.

**शिरूर** लोकसभा मतदारसंघात घोडगाव जुन्नर परिसरातल्या आदिवासी पट्ट्यात मतदारांनी उत्साहाने मतदान केलं. जुन्नर शहरातल्या नगरपरिषद शाळा क्रमांक एक वरल्या मतदान केंद्राची जबाबदारी महिलांनी सांभाळली.

**मावळ** मतदारसंघात सकाळच्या सत्रात आठ केंद्रांवर मतदान यंत्रात बिघाड झाल्यामुळे मतदान थांबवण्यात आलं होतं. बिघाड दुरुस्त झाल्यावर मतदान पुन्हा सुरळीत झालं.

**<><><><>**

जालना लोकसभा मतदारसंघात सकाळी मतदानाच्या सुरुवातीलाच मतदान यंत्रात बिघाड झाल्याचे प्रकार घडले. मात्र, निवडणूक आयोगाने तात्काळ मतदान यंत्र बदलून दिल्यानं मतदानात कोणताही व्यत्यय आला नाही. प्रशासकीय पातळीवर निवडणूक विभागाला द्याव्या लागणाऱ्या अहवालांसह वेबकास्टिंगमध्ये जालना लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात पहिल्या क्रमांकावर आहे, असं उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशीकांत हदगल यांनी सांगितलं.

**<><><><>**

बारामती मतदारसंघातली मतदान यंत्रं ठेवण्यात आलेल्या गोदामातली सीसीटीव्ही प्रणाली बंद पडल्याची तक्रार महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रतिनिधीने केल्यानंतर संबंधित जागेची तपासणी करण्यात आली. इलेक्ट्रिशियनच्या कामादरम्यान एका सीसीटीव्हीची वायर निघाली होती; परंतु, संबंधित वेळेतलं छायाचित्रीकरण उपलब्ध असून दुरुस्ती करण्यात आली असल्याची माहिती बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविती द्विवेदी यांनी दिली. या प्रकरणी हलगर्जी झालेली नाही सर्व डेटा सुरक्षित आहे असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकर्यांसाठी ४ हजार कोटींची भावांतर योजना आणली असून निवडणुका संपल्या की शेतकर्यांच्या खात्यात थेट ४ हजार कोटी रुपये टाकले जाणार असल्याचं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. भाजपाचे उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ त्यांनी आज धुळे मतदारसंघात सभा घेतली. भारताला जगातली तिसर्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनवून देशाला एक सक्षम, बळकट विकसीत राष्ट्र बनवणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. काँग्रेस नेते राहुल गांधी हे देशाचं नेतृत्व करण्यासाठी सक्षम नसून देशाला सुरक्षित ठेवू शकणार नाहीत, असं शहा यांनी म्हटलं.

अमित शहा यांनी पालघर जिल्ह्यांत वसईमध्ये महायुतीचे उमेदवार हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीकडे कोणताही अजेंडा नसल्याची टीका शहा यांनी केली. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा प्रधानमंत्री बनव्यासाठी, देशाच्या विकासाला तिनपट वेगानं पुढे नेण्यासाठी आणि भारताला जगातली तिसऱ्या नंबरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी ही निवडणुक असल्याचं त्यांनी म्हटलं. मोदींनी देशाला सुरक्षित केलं असून दहशतवाद संपवला असल्याचं ही त्यांनी म्हटलं.

**<><><><><>**

राज्यात चारही टप्प्यात झालेलं मतदान महायुतीला अनुकूल असून महायुतीला चांगल यश मिळेल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी मुंबईत बातमीदारांशी बोलताना व्यक्त केला. खडकवासला विधानसभा मतदारसंघात सुनेत्रा पवार यांना फार मोठी आघाडी मिळेल असंही तटकरे यांनी म्हटलं आहे. महायुती म्हणून राज्यात आपण सर्वाधिक जागा जिंकणार आहोत असंही सुनिल तटकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सध्याच्या सरकारने उद्योग स्नेही धोरणाचा अवलंब करत तातडीने निर्णय घेतले असल्याचं राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी म्हटलं आहे. सध्याच्या सरकारच्या काळात नाशिकमध्ये १ हजार ४९४ तर राज्यात एकूण ३५ हजार इतके उद्योग वाढले असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्र व्यापार आणि उद्योग मंडळाच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. व्यापारी आणि उद्योजकांच्या पाठीशी राहिल्यास राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते आणि रोजगारही वाढतो त्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्य सरकार ॲक्शन मोडवर काम करत आहे असंही सावंत म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची शिवसेना महायुतीचे उमेदवार रविंद्र वायकर यांनी आज दादरच्या शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी मनसे नेत्या शालिनी ठाकरे आणि शिवसेना-मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

इंडिया आघाडीचं सरकार येताच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला जाईल, असं वचन काँग्रेसनं दिलं आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ११ जुलै २०1४ ला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारकडे अहवाल सादर केला होता. या अहवालावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षे उलटूनही काही निर्णय घेतला नाही, असा आरोप जयराम रमेश समाजमाध्यमांवर केला. मनमोहन सिंग प्रधानमंत्री असताना तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम आणि ओडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला होता, अशी आठवणही त्यांनी करून दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आपल्या भाषणातून धार्मिक विभाजनाची भाषा करत आहेत. ही भाषा प्रधानमंत्र्याला शोभत नाही, अशी टीका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली. मुंबईत टिळक भवन इथं आयोजित पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते. मोदी सरकारच्या कारभाराला जनता कंटाळली असून देशभर भाजपाविरोधी लाट आहे. या निवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव होणार असून इंडिया आघाडीचं सरकार येणार असल्याचा विश्वासही चेन्निथला यांनी व्यक्त केला.

भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांना पंच्याहत्तरी उलटल्याचं कारण दाखवून राजकारणातून बाजूला केलं गेलं. आता नरेंद्र मोदी ७५ वर्षांचे झाल्यावर अमित शहा यांना प्रधानमंत्री करणार का, असा प्रश्नही त्यांनी विचारला.

दरम्यान, १७ मे रोजी मुंबईत इंडिया आघाडीची सभा होणार आहे. या सभेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, शरद पवार, उद्धव ठाकरे, अरविंद केजरीवाल उपस्थित राहतील. तसंच १८ मे रोजी इंडिया आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद होईल, असंही रमेश चेन्निथला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'वायव्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे बारावीचे निकाल आज जाहीर झाले. या परीक्षेला बसलेले ८७ पूर्णांक ९८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचं प्रमाण गेल्या वर्षापेक्षा ६५ शतांश टक्क्यांनी वाढल्याचं सीबीएसईनं

सांगितलं आहे. चोवीस हजार विद्यार्थ्यांनी ९६ टक्क्यांपेक्षा जास्त तर एक लाख सोळा हजार विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

<><><><>

गडचिरोलीमधल्या भामरागड तालुक्यातल्या  कतरंगट्टाच्या जंगलात  सी- ६० पथकाच्या जवानांबरोबर झालेल्या चकमकीत आज ३ नक्षलवादी  ठार झाले. यात २ महिला नक्षलवाद्यांचा  समावेश आहे.  पोलिसांनी घटनास्थळावरून  तीन स्वयंचलित शस्त्रे , एक एके- ४७, १ कार्बाइन आणि १ रायफल  असा शस्त्रसाठा आणि  नक्षली  साहित्य जप्त केलं आहे.

<><><><>

भारतीय तटरक्षक दलानं काल मुंबईच्या किनाऱ्यावर अवैधरित्या डिझेल ची वाहतूक करणारी एक मासेमारी नौका पकडली. या कारवाईत सुमारे तीस हजार लिटर डिझेल पावणेदोन  लाख रुपये रोख आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे. तसंच नौकेवरच्या ४ कर्मचाऱ्यांना  ताब्यात घेण्यात आलं आहे.

<><><><>

राज्यात आजही अनेक ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली.

मे महिन्यातल्या उन्हाच्या तडाख्यानं हैराण झालेल्या मुंबईकरांना आज दुपारी वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळे उकाड्यापासून सुटका मिळाली.

घाटकोपरमध्ये पेट्रोल पंपाजवळ होर्डिंग कोसळल्यानं ३५ लोक किरकोळ जखमी झाले. जखमींमधल्या एका महिलेला राजावाडी रुग्णालयात दाखल केलं आहे. वडाळ्यात स्टील पार्किंग कोसळल्यानं आठ ते दहा गाड्याचे नुकसान झाले असून एक व्यक्त गाडीमध्ये अडकला आहे. त्याला वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

**कल्याण, ठाकूर्ली, दिवा, बदलापूर, नवी मुंबई** शहरातही पावसाने हजेरी लावली. बदलापूरमध्ये काही ठिकाणी गारा पडल्या. मात्र, अचानक वाऱ्यासह आलेल्या या पावसामुळे मध्य आणि हार्बर मार्गावरच्या उपनगरीय रेल्वे गाड्या उशिरानं धावत आहेत. या वाऱ्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज विमानतळाजवळच्या मेट्रो स्थानकात ओव्हर हेड वायरमध्ये कापड अडकल्यानं मेट्रो सेवाही विस्कळीत झाली.

धुळीच्या वादळामुळे दृश्यमानता कमी झाल्याच्या कारणावरून **छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय** विमानतळावरून विमानांची वाहतूक काही काळासाठी स्थगित करण्यात आली होती. **पालघर** जिल्ह्यात जव्हार परिसरात दुपारी मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे जिल्ह्याच्या पूर्व भागातल्या भात शेतीचं नुकसान झालं आहे. **रायगड** जिल्ह्यात अनेक ठिकाणी संध्याकाळी धुळीच्या वादळासह पावसाच्या सरी कोसळल्या, त्यामुळे मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या रोडावली. **सातारा** शहर आणि जिल्ह्यातही अनेक ठिकाणी पाऊस पडला.

**<><><><><>**

येत्या रविवारपर्यंत नैऋत्य मौसमी पाऊस दक्षिण अंदमानमध्ये दाखल होईल, अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दक्षिण अंदमानसह, बंगालच्या उपसागराचा आग्नेय भाग आणि निकोबार बेटांच्या काही भागात १९ मे च्या सुमारास मान्सून दाखल होण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी येत्या १-२ दिवसात उष्णतेची लाट होण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

दिवसाच्या सुरुवातीला मोठी घसरण नोंदवलेल्या देशातल्या शेअर बाजारांनी दुपारनंतर तेजी नोंदवली. सेन्सेक्सच्या आजच्या किमान आणि कमाल पातळीत

सुमारे १ हजार अंकांचा फरक होता. सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ११२ अंकांची वाढ झाली, आणि तो ७२ हजार ७७६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४९ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार १०४ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

भारताची सृष्टी खंडागळे, आशियाई ट्रॅम्पोलिन जिम्नॅस्टिक चॅम्पियनशिपमध्ये पदक जिंकणारी पहिली भारतीय ठरली आहे.  हाँगकाँग इथं काल झालेल्या सहाव्या आशियाई ट्रॅम्पोलिन जिम्नॅस्टिक चॅम्पियनशिपमध्ये, महिलांच्या वैयक्तिक वयोगटात तिनं रौप्य पदक जिंकलं. महिलांच्या वैयक्तिक वयोगट स्पर्धेत खेळल्यानं  आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी ती पात्र ठरू शकली नाही. या स्पर्धेत कझाकिस्तानच्या डोल्गोपोलोव्हानं सुवर्णपदक, तर हाँगकाँगच्या एस. हंग यानं कांस्यपदक पटकावलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी ऑपरेशन ऑल आऊट अंतर्गत २० तडीपार गुंडांना अटक केली असून शस्त्रं,  अवैध दारुसह  तीन लाख ३४ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**<><><><><>**

कोरोना विषाणूच्या ओमिक्रोन प्रकारातील, के पी 2 हा नवीन उपप्रकार आढळून येत असून, या उपप्रकाराचे राज्यात आतापर्यंत 91 रुग्ण आढळले आहेत. यातील सर्वाधिक 51 पुण्यातील आहेत. हा उपप्रकार सौम्य स्वरूपाचा असून, चिंता करण्यासारखी परिस्थिती नसल्याचं जनुकीय क्रमनिर्धारणाचे राज्य समन्वयक डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी सांगितलं आहे.

**//<><><><><>//**